# ‘स्वत:बद्दल विचार न करता, इतरांबद्दल विचार करा’

## *प्रसंग-* ‘दीपस्तंभ’ संस्थेच्या विद्यार्थ्यांसमोर ‘मिशन’ विषयावरील प्रेरणा सत्रातील सांगतेचे भाषण

*दि. ०१-०६-२००८, स्थळ - सुबीर बोस हॉल, जैन हिल्स,जळगाव*

*डॉ. भवरलालजी जैन हे व्यक्तिमत्त्व तरुणांना प्रेरणास्थानी! त्यांचा संकल्प ते सिद्धीपर्यंतचा प्रवास जाणून घेण्याची सर्वांनाच इच्छा असते. यशस्वी उद्योजकाच्या अनुभवाचे सार आपल्याही जगण्याला नवा आयाम देईल, यासाठी भाऊंना आमंत्रित केले, ‘दीपस्तंभ’ फाउण्डेशनच्या ‘मिशन’ विषयावरील प्रेरणासत्रात. अगदी तरुण वयातच भाऊ ‘महाराष्ट्र लोकसेवा आयोगा’ची परीक्षा उत्तीर्ण झाले. ‘उपजिल्हाधिकारी’ पदावर त्यांची निवडही झाली; तरीही त्यांनी निवडला ‘उद्योगा’चा मार्ग. उपस्थित युवक-युवतीही स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करु इच्छिणारे असल्याने वक्ता आणि श्रोता अशी ‘समर्पकता’च या कार्यक्रमाला लाभते आहे. ‘षड्रिपूं’चा त्याग, म. गांधीजींनी अहिंसेचा दिलेला मंत्र जपा, हे सांगता सांगता वि.स. खांडेकरांच्या ‘थोडे अविचारी व्हा!’ या लेखाच्या माध्यमातून ‘थोडे वेगळे काही करून दाखवा’, हा संदेशही भाऊ येथे देत आहेत.*

सन्माननीय व्यासपीठ आणि विद्यार्थी मित्रांनो,

आज आपण मला प्रश्न विचारायचे आहेत आणि मी उत्तरे देणार आहे. भाषणाने काय होते की, भाषण देणाऱ्याला फार चांगले वाटते आणि भाषण ऐकणाऱ्यालाही चांगले वाटते. अर्थात त्याची दोन कारणे असतात. एकतर बोलणारा चांगला असला, तर तो चांगले बोलतो आहे, म्हणून आपल्याला समजते. पण त्यातले नेमके किती समजले, याचे मोजमात करण्यासाठी कोणतेही साधन उपलब्ध नाही. आणि दुसरे कारण म्हणणे आपल्या ऐकणाऱ्यांच्या मनात काही ना काही प्रश्न, अडचणी निर्माण झालेल्या असतात आणि त्या शंका, प्रश्न, अडचणी ह्या शेवटपर्यंत तशाच अनुत्तरीत राहतात, असेही बरेचदा होते. शंका आणि प्रश्नांचे ओझे तयार होते ते ओझे, ती गुंतागुंत सोडवण्याचा प्रयत्न आपण आत्ता करू. माझ्या अनुभवातून आणि डोळ्यातून हे जग मी पाहिले आहे, आता माझे वय ७१ वर्षांचे आहे.

मित्रांनो, मी सर्वसाधारणपणे दीडशे ते दोनशे वर्षे जगलो आहे, याचा अर्थ असा आहे की, मी एवढ्या इन्टेन्सली जीवनाकडे बघितले आहे, प्रत्येक गोष्टीबद्दल मी विचार

केला नाही आणि ती गोष्ट केली, असे घडले नाही! अगदी केशभूषा, वेशभूषा, जीवनाचे उद्दिष्ट, जीवनाचे मार्ग, साधन आणि साध्य यांची शुचिता वगैरे असे विभिन्न विषय माझ्या आयुष्यात आलेले आहेत. अलीकडे आम्ही संकलन करीत आहोत की, आत्तापर्यंतचा जो इतिहास निर्माण झाला. १९६२ पासून तर आजपर्यंत, त्यामध्ये लोकांनी आपल्याबद्दल काय लिहिले, बोलले आणि आपण काय लिहिले? आपण कोणकोणत्या विषयावर व्याख्याने दिलीत, विचार व्यक्त केले. एकूण या संकलनाची अकरा पुस्तके तयार होत आहेत.

या पुस्तकांमध्ये ही कंपनी कशी उभी झाली? व्यवसाय कसा चालवला? त्याचा विस्तार कसा झाला? या सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे आहेत. मी १५० लोकांचे एकत्र कुटुंब चालवले आहे, अजूनही चालवतो आहे, त्याबाबत लिहायचे आहे, अजून माझ्या यादीत तेवीस पुस्तके आहेत, आणि या तेवीस पुस्तकांचे लिखाण मला येत्या दोन वर्षात पूर्ण करायचे आहे. त्यापैकी चार झाली आहेत, तीन होण्याच्या मार्गावर आहेत आणि त्यानंतर दहा पुस्तकेमला स्वत:ला लिहायची आहेत. तेव्हा आपल्यासमोर असा एक व्यक्ती उभा आहे की, ज्याने जीवनाला अगदी जवळून आणि अत्यंत गाढ दृष्टीने पाहिले आहे. आपल्यापैकी काही जणांच्या मनात असेही काही प्रश्न असतील, ज्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला पालकांकडून, शिक्षकांकडून, समाजाकडून मिळाली नाहीत किंवा आपण ते प्रश्न त्यांना विचारलेच नाहीत, आणि त्यामुळे ते प्रश्न तुमच्या मनात तसेच राहून गेले, असेही प्रश्न येथे उपस्थित केले तरी चालणार आहे.

एक प्रश्न सर्वसाधारणपणे आपल्या डोळ्यांसमोर येतच असतो की, मोठे व्हायचे असेल तर त्यासाठी आपल्याला आयुष्याच्या वाटचालीत कुठे ना कुठे. काही ना काही तडजोडी ह्या कराव्याच लागतात. आणि त्यामध्ये भ्रष्टाचार करणे किंवा वाईट मार्गाने जाणे असे करणे काही प्रसंगी क्रम:प्राप्त होते. भ्रष्टाचार केल्याशिवाय कोणी माणूस मोठा झाला असे आपल्या मनाला पटत नाही आणि घरी आई-वडील, घरातली भावंड, समाज रात्रंदिवस या गोष्टीचा टाहो फोडत असतात की, अमुक-तमुक राजकारणी आहे म्हणून त्याचे असे झाले, असा एक तो डॉक्टर आहे, तो पेशंटला लुबाडतो, म्हणून तो मोठा झाला. हा क्लास चालवतो म्हणून हा मोठा झाला. अशा नाना तऱ्हेच्या गोष्टी तुमच्या मनावर बिंबवल्या जातात आणि कधी-कधी तसे काही स्वत:लाही अनुभव येतात आणि मग तुमचा तसा विचार पक्का होतो, या सर्व गोष्टींमुळे आयुष्याकडे बघण्याची वेगळीच दृष्टी तयार होते अशावेळी जगण्याकडे दृष्टिकोन निरागस आणि सकारात्मक न होता पूर्व

ग्रहभूषित आणि अनेकदा अगदी टोकाच नकारात्मक होत जातो. ज्यावेळी माणूस नकारात्मक भूमिकेतून आयुष्याकडे पहायला लागतो त्यावेळी त्याची स्वत:ची पन्नास टक्के शक्ती त्यातच खर्च झालेली.

आपल्यासमोर असे अनेक प्रश्न असतात उदा. पोलीस खाते आहे, विक्रीकर खाते आहे, महसूल खाते आहे या सर्व यंत्रणेत मोठा व्यापार करत असताना भ्रष्टाचार केल्याशिवाय माणूस मोठा होऊच शकत नाही, असे एक मतच तयार झाले आहे. थोडक्यात यापैकी काही प्रश्न माणसाच्या आयुष्ययात्रेत अनुत्तरीत राहून जातात, जगण्याचा प्रवाह तर अव्याहतपणे सुरुच राहतो आणि राहणार आहे. त्यामुळे अनेक गोष्टींवर विचारच करायला वेळ मिळत नाही, अशी परिस्थिती निर्माण होते, कारण प्रत्येक गोष्टीला गती मिळालेली आहे. त्यातल्या त्यात वाईट गोष्टींना अधिक वेगाने गती प्राप्त झाली आहे.

एकदा मी आणि गुजराथचे मुख्यमंत्री चिमणभाई प्रवास करत होतो. आम्ही जैन इरिगेशनमधून धुळे रस्त्यावर जात होतो. त्यांनी सगळीकडे हिरवेगार रान बघितले आणि ते म्हणाले की, 'भवरलालजी यहाँ इतने पवित्र हो गये, पर यहॉं जो फसल लगी है वो देखतेही नही, कोन-कोनसे फसल लगाए है?' त्यांना म्हणायचे होते इथे तणंच एवढे जास्त आहेत की, लागवड केलेली मुळ रोपटी नेमकी कशाची आहेत? हे दिसतच नाही! तेव्हा मी त्यांना सांगितले की, ' लाजमी है समाज मे जितने दुर्जन है, उतने सज्जन तो नही और इसलिये खेतमे असलमे जो पौधे लगाए गये है वह दिखते नही. लेकीन दुर्जन जरूर दिखते है.' तर समाजामध्ये तण हे नेहमीच जास्त वेगाने उगवणारे आहे, आणि मुळात जे चांगले लोक आहेत, ते एकतर उदासीन असतात किंवा त्यांच्या जगण्याचे ताणे-बाणे अगदी नाजूक जागी गुंतागुंत झाल्यासारखे, अडकलेले असतात.

स्पष्ट बोलणे हा आपल्या समाजात एक गुन्हाच समजला जातो. ज्या लेखाने माझ्या आयुष्यावर इम्पॅक्ट केला आहे, त्या लेखाचे शीर्षक होते की, 'थोडे अविचारी व्हा!' (वि.स.खांडेकर)त्या शीर्षकामुळेच मला ते वाचावे वाटले होते. त्या पुस्तकात लेखकाने फार सुंदर उदाहरण दिले होते. त्यांनी सुरुवातच अशी केली होती की, कोणाला असे वाटते का? की, गांधीजींनी त्यावेळी ठरविले होते की, कोणतेही हत्यार हातात न घेता, अहिंसक पद्धतीने ब्रिटीश राजवटीचा आपण अंत करू आणि आपल्या देशाला आपण स्वातंत्र्य मिळवून देऊ. ज्यांच्या राजवटीवर सूर्य मावळत नाही अशी ज्यांची ख्याती आहे आणि अक्षरश: अशी ज्यांची बलाढ्य परिस्थिती होती, अशा साम्राज्याला आपण हत्याराशिवाय

हरवून टाकू हा विचार होता की, अविचार होता?

अविचार नेमके कशाला म्हणायचे? हे आधी समजावून घेऊ की, जे रुढीमध्ये बसत नाही. जे नेहमीच्या संकेतात बसत नाही, जे सर्वसाधारणपणे तर्कशास्त्रात बसत नाही. त्याला 'अविचार' म्हणू या! समजा एकच व्यक्ती आहे आणि ती व्यक्ती १०० व्यक्तींना मारायला निघाली हे तर्क शास्त्रात बसते का? नाही बसत. म्हणजेच जे तर्कात बसत नाही, जे पारंपरिक नाही, ज्याचा लोक विचार करीत नाहीत, त्याला ही आपण 'अविचार' म्हणायचे असते. त्यामुळे तो अविचारच होता, पण त्या अविचारातून एका क्रांतीचा जन्म झाला आणि जगाला एक नवीन दिशा मिळाली. एक नवीन हत्यारही मिळाले. ज्याचा वापर केल्याने कोणीला कसल्याही प्रकारे दुखवणार नाही, ज्या कोणालाही इजा होणार नाही, रक्तपात तर होणारच नाही आणि तरी आपली उद्देश मात्र साध्य होईल. हे खरोखरच, आश्चर्य वाटण्यासारखे आहे!

आपल्याला वाटेल की, हे कसे शक्य आहे? समजा, आपण एखाद्या व्यक्तीला शत्रू समजतो. मला किती शत्रू आहेत? हे आठवण्याचा मी प्रयत्न केला, पण मला एकही आठवला नाही, परंतु जेव्हा मी खूप खोलवर विचार करत गेलो, तेव्हा मात्र माझ्यामधले शत्रू मला दिसले. राग, द्वेष मत्सर, लोभ हे एवढे, सगळे माझे शत्रूच आहेत. या सर्व शत्रूंवर जर आपण विजय मिळवू शकलो, तर फार मोठी गोष्ट होईल. या सर्व शत्रूंवर विजय मिळवणे आपल्या हातात आहे म्हणून गांधीजींनी काय ठरवले की, आपल्याला ब्रिटिशांना विरोध करायचा नाही, तर ब्रिटिश राजवटीला घालवायचे आहे, त्यांची राजवट ही अन्यायी आहे, ते अन्यायी नाहीत, तर द्वेष कोणाचा करायचा? तो अन्यायी माणसाचा न करता, अन्यायाचा करायचा आहे. कारण तो अन्यायी आहे, हे ठरवण्याचा अधिकार आपल्याला आहे का?

ब्रिटिश तर स्वत:ला समजतात की, ते न्यायी आहेत, म्हणूनच ते राज्य करत आहेत. यांच्या लक्षात येत नाही की काय? आपण अन्याय करता आहोत हे तर आपण ज्या गोष्टीला शत्रू मानतो त्याला संपवायचे जर असेल, तर काय करायचे? दोन पर्याय आपला समोर लगेच दिसतात, एक तर त्याला जिवे मारुन टाका म्हणजे तो संपेल किंवा त्याला मित्र करुन घ्या! त्याला मित्र जरी केले तरी त्यातला शत्रू तर संपेल ना! तो शरीराने जरी संपला नसेल, तरी त्याला शरीराने संपवण्यामध्ये काय अर्थ आहे? त्याची गरजच नाही. उलट जर आपण त्याला मारले तर त्याचा मुलगा आपल्या मुलाला मारण्याचा प्रयत्न करेल आणि ते पिढीजात असेच होईल. उलट मैत्री करुनही शत्रू संपवता येतात. याबाबतची

वागणूक ही अहिंसात्मक असली पाहिजे.

शत्रू संपवायचे असतील, तर आपल्या आत बसले आहेत ते षड्रिपू शत्रू ते आधी संपवावे लागतील आणि ते संपले तर विषय संपला! थोडक्यात खांडेकरांनी जे म्हटले आहे की, ‘थोडे अविचारी व्हा!’ जो विचार आहे तो असा आहे की, थोडे ‘आऊट ऑफ बॉक्स’ विचार करा. जे प्रचलित नाही, जे तर्काला धरुन नाही. परंतु आपल्याकडे दुर्दम्य असा आशावाद आहे की, हे घडू शकते तरी अवश्य प्रयत्न करुन पहा आणि त्यासाठी लागणारी किंमत आपण मोजायला तयार नसाल, तरी ते घडेलच!

माझा मुलगा अनिल हा फार हुशार आहे. अगदी युरोपीयन अमेरिकन लोकांशी सुसंवाद साधणे, त्यांना सांभाळून घेणे, त्यांचेशी इंग्रजीत सुंदर बोलणे, सर्व व्यवहार करणे इतके सर्व गुण त्याच्यात आहेत, एकदा त्याने मला एक प्रश्न विचारला की, ‘सूर्यप्रकाशापासून शक्ती निर्माण होऊ शकते त्यादृष्टीने आपण काही करायला पाहिजे, पण मला त्यात एक समजले नाही की, त्यातून आपले बिजीनेस मॉडेल बनेल! म्हणजेच इतर मॉडेलमधून आपल्या कंपनीला पैसे मिळतील, असे काहीतरी दाखवावे लागेल की नाही? त्याशिवाय कसे जमेल?’ अनिलने असा प्रश्न विचारल्यावर मी त्याला समजावून सांगितले की, ‘अनिल तू मला पंचवीस वर्षोंपूर्वीची आठवण करुन देतो. २५ वर्षोंपूर्वी म्हणजे साधारण १९८७-८८ ची गोष्ट आहे, मी आय.सी.आय.सी.आय. फायनान्शीयल इन्स्टिटयूटकडे जैन इरिगेशनच्या ठिबक सिंचनाच्या प्रस्तावासाठी गेलो होतो. तेव्हा तेथील कार्यकारी संचालकाने मला असाच प्रश्न विचारला होता की, ‘आपने मार्केट सर्व्हे किया क्या? मी म्हटले, नाही केला. तो आपके पास कुछ रेफरन्सेस है क्या? आपके पास बिजनेस करने का मॉडल है क्या?’ मी म्हटले असे माझेजवळ काही नाही. तेव्हा ते म्हणाले की, ‘असे असेल तर आपल्याला कोणतीही वित्तीय संस्था पैसे कसे देणार?

तेव्हा मी म्हटले की, ‘साहेब मी मॉडेल तयार करण्याच्या तयारीत आहे आणि त्यासाठीच तर आपल्याकडून भांडवलाची मागणी करता आहे. मला आपण सांगा की, शेक्सपियरची कॉपी आजपर्यंत बनली आहे काय? हिटलरची कॉपी बनली आहे काय? किंवा महात्मा गांधीजींची कॉपी तयार झाली आहे का? ज्यांचे मॉडेलच नाहीत मूळ कॉपीच नाही तर त्याचे मॉडेल आपण कसे काय मागता?’ मी त्यांना म्हटले, मी असे ओरिजनल काम करत आहे जे आजपर्यंत कोणीही केलेच नाही. मग मी आपला मार्केट सर्व्हे किंवा मॉडेल कसे आणून देऊ काय म्हणून देऊ? मार्केट हाच सर्व्हे आहे. आकाश जेवढे उंच आहे,

तेवढा या व्यवसायाला वाव आहे आणि माझा हा दुर्दम्य आशावाद आहे की, मी हे करू शकतो!

आपल्याला जर विश्वास असेल की, मी हे करु शकतो, तर आपण मला कर्जरुपाने भांडवल द्या आणि त्यांनी दुसरी गोष्ट ही मला सांगितले किंबहुना अटच टाकली, आपल्या संचालक मंडळावर बाहेरचे काही जाणकार लोक घ्यावे लागतील, तरच आम्ही आपल्याला वितरित करु शकतो. तेव्हा मी त्यांना म्हणालो की, मी बाहेरचे लोक संचालक म्हणून कशाला घेऊ? मी पैसे लावणार आहे, व्यापार मला करायचा आणि मी नामधारी बाहेरचे लोक घेऊ हे मला काही पटत नाही तसेच मी त्यांना सांगितले की, मी छोटा माणूस आहे, मला इथे कोणी जास्त ओळखत नाही, माझ्या कार्यकारी मंडळात कोणी कशाला? आज आपल्या बोर्डावर रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर आहेत, आज आपल्या बोर्डावर फार मोठमोठाली लोक आहेत. त्यावेळी ते ही आलेला नसतो.

मी त्यांना म्हणालो की, “मी हा व्यापार करू शकतो आणि बँकेने दिलेले की फेडू शकतो असे जर आपल्याला वाटत असेल, तरच आपण मला कर्ज द्या.” अशा पद्धतीने एखाद्या मॅनेजींग डायरेक्टरशी बोलणे हा एक अविचारच आहे. तेव्हा ‘थोडेसे अविचारी व्हा,’ हा जो वि. स. खांडेकरांचा संदेश होता. थोडक्यात मला असे सांगायचे आहे की, ‘आऊट ऑफ द बॉक्स’ आपण जायला शिकले पाहिजे, आणि ते जर शिकले तर नवीन काही करु शकाल.

मला आईकडून प्रेरणा मिळत गेली. आईने मला एक अगदी वेगळाच मंत्र दिला. ती शिकलेलीच नव्हती. तिला फक्त एक विशी, दोन विशी समजत होती. मी पदवीधर झालो. त्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण झालो. ‘उपजिल्हाधिकारी’ या पदासाठी माझी निवड झाली. तेव्हा मी आईला विचारले की, ‘आई मी काय करु? मला ही नोकरीची संधी चालून आली आहे आणि काही लोक म्हणतात की, व्यवसाय करावा.’ तेव्हा आईने सांगितले की, ‘ते मला काही समजत नाही, पण एवढे सांगते की, तू असे काहीतरी कर, ज्यामुळे तुझे पोट भरेल आणि तुझ्या अवतीभवती जे नातेवाईक आहेत त्यांचेही पोट भरले पाहिजे, त्याचबरोबर पशुपक्षी किंवा ज्यांचे कोणी वाली नाही या सगळ्यांचे भले होईल असे काहीतरी कर. ज्यात तुझेही भले होईल. तुझ्या कुटुंबाचेही भले होईल असे काहीतरी कर.’ त्यातून मी एवढाच अर्थ काढला की ‘शेतीच कर!’कारण आईने सांगितले ते सर्व काही शेती करण्यातून साध्य होऊ शकत होते. निर्मितीचे काम म्हणजे शेती! सृजनशीलता

मातेत-महिलेत असते आणि शेतीतही! या दोन शक्ती श्रेष्ठ आहेत. बीजरोपणाचे काम पुरुष करु शकतात, परंतु संगोपनाचे काम करु शकत नाहीत आणि निर्मिती करण्याचे काम करु शकत नाहीत. पृथ्वीसुद्धा स्त्रीलिंगी आहे. निर्मितीची जी बाब आहे, ती या दोन गोष्टी करु शकतात. शोध लावणे वेगळे उदा. एडीसनने हा शोध लावला, आईनस्टाईनने तो शोध लावला. हे आपल्याला माहीत आहे. अणुबॉम्बही बनविले, शोध लावला म्हणजे काय? इकडची-तिकडे जुळवाजुळव केली आणि त्यातून काहीतरी निर्मिती झाली.

नवीन गोष्ट निर्माण करायचे असेल, एका दाण्यातून शंभर दाणे निर्माण करायचे असतील, तर एका ज्वारीच्या कणसाला दीडशे ते दोनशे दाणे असतात, आणि टाकताना एक दाणा टाकलेला असतो हे काम भूमी करत असते आणि तेच स्त्री करते आणि त्यामुळे आपण आपल्या मनामध्ये पक्के केले पाहिजे की, फक्त आई असते तोपर्यंत आपल्याला चांगले वाटते कारण, ती आपली सगळी कामे करून देते, परंतु जेव्हा एखादी स्त्री ही आपल्या समोर पत्नी बनून येते, तेव्हा आपण तेवढी किंमत करत नाही, आदर करत नाही. उलट काही लोक तिला प्रतिस्पर्धी म्हणून बघतात, तर काही लोक सेकंडरी रोलमध्ये बघण्याचा प्रयत्न करतात, पण या दोन्ही गोष्टी अत्यंत चुकीच्या आहेत आणि यातूनच समाजात आणि घरात कलह निर्माण झाला आहे, असे असल्यामुळे होत ऱ्हास आहे.

माणूस ज्यावेळी चतुर्भुज होतो त्यावेळी त्याला दोनच हात असतात. लग्नानंतर ते एकतर चार होतात किंवा आहेत दोन्ही कापल्या तरी जातात. आता हे आपल्यावर अवलंबून आहे की, आपण दोनाचे चार करायचे की, दोन कापून टाकायचे आणि आयुष्याला आजीवन रंगभूमी न समजता, रणभूमी समजायचे! प्रत्येकवेळी प्रश्नाचे उत्तर प्रश्नांनीच द्यायचे. अशी रीतच काहींची असते. पुरुषांशिवाय स्त्री जगू शकत नाही ही वस्तु:स्थिती आहे, पुरुषही स्त्रीशिवाय जगू शकत नाही, ही वस्तु:स्थिती आहे. त्याचेच नाव सृष्टी आहे! असे असताना आपण एकमेकांकडे अशा रीतीने पाहणे, आणि आपण दोन कॅम्पमध्ये उभे आहोत आणि त्यादृष्टीने ती मुक्ती चळवळ, क्रांती वगैरे असे जे मोठे शब्द वापरले जातात ही अगदीच असंयुक्तिक बाब आहे, असे माझे मत आहे.

एकमेकांचे परस्परांशिवाय चालूच शकत नाही, असा तो रथ आहे. त्या रथाची जी दोन चाके आहेत त्यापैकी एक जर नाजूक असेल तर हा रथ पुढे जास्त वेग धरूच शकत नाही. तर दोघांनी परस्परांना विचार करुन वागायचे ठरवले पाहिजे आणि म्हणूनच म्हटले आहे की, प्रत्येक पुरुषाच्या यशाच्या मागे स्त्री असते ते खरेही आहे. त्यातही हा नशिबाचा

खेळसुद्धा आहे की, काहींना समर्पित पत्नी मिळतात, पण तेवढे समर्पित पती आपण आहात की नाही? हासुद्धा आपण विचार केला पाहिजे. त्याशिवाय समर्पणाला काहीही अर्थ नाही! अर्थात, एकाकी समर्पणाचे दिवस आता राहिलेले नाहीत. परस्परांबद्दलची जी आपली शक्ती आहे, ती शक्ती एकमेकांशी जोडली पाहिजे, आणि दोघांना समानतेने बघितले गेले पाहिजे.

आईने मला सांगितले, तेव्हा मी शेतीकडे वळलो, आणि जसजसे हे घडत गेले तस तसे ते करत गेलो, त्याचे काही नियोजन नक्की नव्हते. त्यावेळी फक्त माझेजवळ सात हजार रुपये होते, जास्त पैसेच नव्हते. त्यामुळे नियोजन करण्याचा प्रश्न कुठे होता? हे सगळे एका माणसाने तयार केले. हा एक खांबी तंबू आहे. त्याही काळात सात हजार रुपयात जास्त काही करणे शक्य नव्हते. माझ्या मुलाने माझ्यासाठी सात हजार रुपयाचा जोडा आणला. तेव्हा मी त्याला सांगितले की, मला याची गरज नाही, हा जोडा तुझ्याच पायाला शोभून दिसतो! म्हणजेच आज सात हजार आणि पंधरा हजार रुपयांचा नुसते जोडे येतात, तर सांगण्याचे तात्पर्य असे की, त्याही वेळा सात हजार रुपयात काहीच येत नव्हते.

त्याकाळी सात हजार रुपयांमध्ये मी फक्त रॉकेलचा साठा करण्यासाठी रिकामे ड्रमच घेऊ शकलो, पण आयुष्याच्या वाटचालीत अनेकगोष्टी घडत गेल्या आणि रात्री जे स्वप्न बघितले त्याच्याच मागे सकाळी उठून मागे लागायचे, आणि ते अस्तित्वात आणण्यासाठी खूप परिश्रम घ्यायचे! स्वप्न आणि 'कष्ट' असे करता करता हा प्रवास पुरा केला, पण कोणाला फसवायचे नाही, कोणी आपल्याला फसवले असेल, तर त्याचीही आठवण ठेवायची नाही. दोन तत्त्वे जपलीत की, आपण ज्यांच्यासाठी चांगले केले असेल, त्यांची आठवण ठेवायची नाही आणि ज्याने आपल्यासाठी चांगले केले असेल त्यांना कधीही विसरायचे नाही.

मित्रांनो, स्वप्नपूर्तीसाठी आपल्याला खूप मेहनत करावी लागेल, हे गृहीतच धरले पाहिजे आणि रात्रंदिवस कठोर परिश्रम करत राहायचे आणि आपल्याला जसजशी साधने उपलब्ध होतील, तसतसे पुढे जात राहायला हवे, याच पद्धतीने माझा तरी विकास झाला आहे, आणि त्याचबरोबर माझ्या आजूबाजूचे लोक होते, त्यांचाच मी जास्त विचार करत आलो आहे.

सामाजिक बांधिलकीचे ऋणसुद्धा मी पाळू शकलो. त्याचे कारण असे की, पैशासाठी

मी कामच केले नाही. त्यामुळे पैशाबद्दल मला अवास्तव प्रेमही निर्माण झाले नाही. मात्र जे योग्य असेल, ते झाले पाहिजे त्यासाठी आपल्याजवळ नसले, तरी उधार आणू किंवा आपण कर्जाने आणू पण आपण ज्याचे त्याला दिले पाहिजे अशा वृत्तीने वागलो. मी आपल्याला चांगली तीन तत्त्वे सांगितली. आपल्यासाठी ज्यांनी काही चांगले केले असेल, ते आपण विसरायचे नाही. तसेच आपल्याजवळ जे साधन असेल त्या साधनसामग्रीसह सुरुवात करुन, आपण कठोर परिश्रम केलेच पाहिजे. आपण हुशार आहात, हे आपण विसरुन जा! कारण जगाच्या मानाने आपली हुशारी ही नगण्य आहे.

आपण काय होणार आहात? हे तर तुमचे भविष्यच ठरवणार आहे. तेव्हा तुमची आजची जी स्वत:बद्दलची असेसमेंट आहे त्याला विसरा. तुमची जी जबाबदारी आहे, ती मात्र विसरु नका. ही जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडा, एवढेच लक्षात घ्या. आपण जे प्राप्त केले आहे. ते फार मोठे कौशल्य आहे, असा समज बाळगू नका. मी बहुतांशी असे पाहिले आहे की, जे ॲकेडेमीकली यशस्वी लोक असतात, ते आयुष्याच्या पडद्यावर नेमके अयशस्वी होतात, त्यांना नातेसंबंध सांभाळता येत नाही. उदा. आपला जो माल विकायचा आहे तो कसा विकायचा? अशी गणिते त्यांना साधता येत नाहीत. आपले विचार, पत्नीला समजावता आले पाहिजे ना! किंवा पत्नीचे विचारसुद्धा आपल्याला समजावून घेता आले पाहिजे. आधी घरात समन्वय साधायला शिकले पाहिजे, परिणामी बाहेर बरोबर साधता येईल.

जर आपण हे करु शकला नाहीत, तर तुमचा व्यवहार कसा चालेल? हा मोठा प्रश्न आहे. प्रत्येक ठिकाणी तुम्हाला सेल्समन होणे गरजेचे आहे आणि त्याची सुरुवात तुमची आई, पत्नी आणि मुलगा यांच्यापासूनच होणे गरजेचे आहे. माझ्या आईने सांगितले की, ‘मी माझ्या प्रत्येक मुलीच्या लग्नात हुंडा दिला आणि आता तुझ्या लग्नाचा हुंडा घ्यायला तू नाही म्हणतो हे बरोबर नाही. माझी आई म्हणाली पुढे असे म्हणाले की, ‘प्रत्येक मुलीच्या लग्नाच्या वेळी माझे दागदागिने मोडले’ त्यावेळी मी गोरागोमटा, देखणा दिसत होतो आणि हुशार होतो. मला भाषेमध्ये ७२ मार्क मिळाले होते. तेव्हा मी आईला समजवले. आईला विचारले की, ‘ज्या दोन मुली पाहिल्या आहेत, काय करायचे? जी मुलगी अधिक अनुरुप आहे तिच्या आई-वडिलांजवळ हुंडा नाही आणि तू तर म्हणते की, हुंडा पाहिजे आणि तू जे म्हणाली की, मी दिसायला सुंदर, गोंडस आहे तर ती येणारी जी तुझी सून आहे तीही तेवढीच सुंदर आहे. तू दुसरी गोष्ट अशीही सांगितली की, तुझा मुलगा हुशार

आहे त्यावर मी सांगतो की, तीसुद्धा बी. ए. झालेली आहे. ती एस.एन.डी.टी कॉलेजची बहि:शाल विद्यार्थिनी आहे.

मी आईला पुढे हे ही शांतपणे संगितले, कॉलेजमध्ये न जाताच बी. ए. पास झाली आहे. म्हणजेच ती हुशार असलीच पाहिजे आणि विशेष म्हणजे मी तुझ्या होणाऱ्या सुनेशी दोन तास बोललो आहे. तू म्हणाली की, तू तुझ्या मुलींसाठी हुंडा दिला आणि त्यामुळे तुला हुंडा पाहिजे. तर तुला सांगतो की, तिच्या बहिणीच्या लग्नामध्ये जी वरात आली होती ती पूर्ण वरात फर्स्टक्लास ए. सी.च्या डब्ब्यात मुंबईहून बिजापूर पर्यंत आली होती. त्यावेळी इंग्रज लोक फक्त ए. सी. मध्ये प्रवास करीत असत. तर त्यांनी मुंबईहून बिजापूरपर्यंत पूर्ण रेल्वेच बुक केली होती, म्हणजे एवढी संपत्ती त्यांच्याजवळ होती. आईला मी शेवटी हेही सांगितले की, तू जसे पैसे खर्च करुन मुलींचे हौशीने लग्न लावले तसेच तिच्या वडिलांनीही पैसा खर्च केला आहे. आज मात्र त्यांची परिस्थिती आधीसारखी राहिलेली नाही. तिच्या तिन्ही मूळ प्रश्नांची उत्तरे दिली होती.

आई म्हणाली की, 'तू वकील माणूस, मी तुझ्या समोर काय बोलणार? तुझ्या मनात जे असेल ते कर मी सून आणते कशासाठी याचाही तू विचार कर आता मी म्हातारी झाली, मी इतके कष्ट केले, मला आता थोडा आराम नको का? असे व्हायला नको की, तुझी पत्नी जाणार ऑफिसमध्ये आणि तिलाच डबा नेऊन द्यावा लागेल.' मी म्हटले, 'तसे काही होणार नाही मी माझ्या पत्नीला नोकरी करु देणार नाही आणि गरज असेल तर ती मला माझ्या कामात मदत करेल. परंतु तिला नोकरी करायची नाही हे तिनेच नक्की केले आहे. त्यामुळे तिला डबा पाठविण्याची वेळ तुझ्यावर येणार नाही हे निश्चित आहे आणि तिला स्वयंपाक येतो त्यामुळे ती स्वतः करेल' तेव्हा आई म्हणाली की, 'ठीक आहे तुझी इच्छा आहे तर चांगलेच होईल' असे म्हणून तिने मला त्या मुलीसोबत लग्न करण्याची परवानगी दिली.

महत्त्वाचा मुद्दा मला तुम्हाला सांगायचा आहे की, जीवनामध्ये प्रत्येक गोष्ट माणसाला विकावी लागते. माझा विचार हासुद्धा मला विकावा लागला, तिला समजावून सांगावे लागले, तिचा विचार मी समजावून घेतला. तिचे लॉजीक मी समजून घेतले त्यातून मार्ग काढला म्हणूनच मी त्यावेळी बिना हुंड्याचे लग्न करु शकलो. त्यानंतर माझी आई त्या सुनेला आयुष्यभर डोक्यावर घेऊन फिरली. माझी सून जगावेगळी आहे, मी अशी सूनच पाहिली नाही! अगदी अशी सगळ्यांकडे मिरवत फिरली, अर्थात तिची सून तशी चांगली

वागली, म्हणून मिरवत फिरली. तेव्हा तुमची हुशारी केवळ त्या आकड्यांपुरता मर्यादित ठेऊ नका. त्याला **'विचारांची झालर लावा. त्या विचाराबरोबर आचार आणि उच्चार ही शैलीसुद्धा तुम्हाला जमली पाहिजे. तरच यश प्राप्त होते!**

**विचार, उच्चार आणि आचार यामध्ये जर एकवाक्यता आली तरच जीवन आदर्श घडते.** तसेच आपली गोष्ट दुसऱ्याला समजावता आली पाहिजे आणि दुसऱ्याची गोष्ट आपण ऐकली पाहिजे. आपली गोष्ट दुसऱ्याला समजावता आली पाहिजे यापेक्षाही महत्त्वाचे हे आहे की, दुसऱ्याचीही गोष्ट आपण ऐकली पाहिजे. आपण नेहमी असा विचार करायला हवे आपल्याला नक्की कोणत्या मार्गाने जायचे आहे? तो मार्ग निश्चित करून घ्या. आणि आपले उद्दिष्ट कोणते आहे? हे ही स्पष्टपणे लक्षात ठेवा.

प्रश्न - आजच्या परिस्थितीत आम्ही काय करायला टाळले पाहिजे?

भाऊ - स्वत:बद्दल विचार न करता इतरांबद्दल विचार करणे शिकायला पाहिजे. आत्मकेंद्रित होऊ नका. माझ्या पलीकडे जग आहे, याची सतत आठवण ठेवा. मी जगातला फार लहान अंश आहे याची जाणीव ठेऊन वागा. तसेच जे जग आज करते आहे ते मी ही करणे आवश्यक आहे का? याचाही डोळसपणे विचार करा आणि जर तुम्हाला वाटेल की ते करणे योग्य नाही तर तसे लादूर घेवू करू नका! आई-वडिलांचा आदर राखणे ही एक जुनी अख्यायिका आहे आणि ती आता रामायणात जमाच झाली आहे, आणि आपले स्वत:चे स्वातंत्र्य, मला स्वत:चे अस्तित्व आहे, मी काही कमी नाही. दुसऱ्यांपेक्षा मी श्रेष्ठ आहे असे विचार आपल्या मनात असतील तर ते टाळा हे सर्व साध्य झाले तर तुम्हाला समजेल की, सुख आणि दु:ख या दोन्हींचे मूळ नेमके कशात आहे.

आपण जर ते टाळले तर ते सुखाचे मूळ आहे आणि जर आपण ते टाळले नाही तर तेच दु:खाचे मूळ आहे! कारण सगळेच प्रश्न आणि संघर्ष तिथूनच निर्माण होतात, कारण आपण नेहमी असे गृहीत धरतो की, मी इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे. I am better than other, if I am better than other, then others are infairior to me, them they must listen to me and if they don't listen to me, they are bad, if they are bad I will fight with them मी कशासाठी त्यांचे ऐकू? असा प्रश्न निर्माण होतो. स्वत:बद्दल विचार करणे बंद करा, आणि इतरांचाही बरोबरीने विचार करा. याचाच अर्थ दयाळूपणाची भावना किंवा ज्याला सहभाव आपण म्हणतो त्या भावनेला विकसित करा (संवेदनशीलता, अनुकंपा. डेव्हलप करा).

कोणाच्या डोळ्यात अश्रू असतील आणि आपलयाला, शक्य असेल तर अश्रू पुसायला शिकले पाहिजे. स्वत:ला विसरलो तरच स्वत:वर केंद्रीत होऊन जो माणूस जगतो, तो माणूस फार लांब चालू शकत नाही. दुर्योधनाने पांडवांचा कधी विचारच केला नाही, त्याने स्वत:चाच विचार केला की, मी किती बलवान आहे, माझ्याजवळ काय काय कला आहेत, मी काय काय प्राप्त केले आहे. मला कोण-कोणते वर आहेत वगैरे. पण तो विसरुनच गेला की, त्याच्याजवळ जसे वर आहेत तसे दुसऱ्याजवळही आहेत. आणि कदाचित दुर्योधनापेक्षा जास्त तपश्चर्या ज्याने केलेली असेल. त्याच्याजवळ निश्चितच जास्त वर असतील, हे उघड आहे. तो आपल्याला मारेल किंवा तो हरवेल असा विसरच, दुर्योधनाला पडला होता,त्यातून महाभारत घडले.

**आपल्या आयुष्याच्या रणांगणावरील महाभारत टाळायचे असेल, तर आपण स्वत:बद्दल जास्त विचार न करता इतरांबद्दल जास्त विचार करा!** मग ती आई असो, वडील असो, भाऊ असो, समाज असो किंवा कोणी असो. सुखाकडेसुद्धा डोळसपणे पहा. दु:खात वाहून जाऊ नका आणि सुखातही वाहून जाऊ नका. आपण जे आहात, त्याची स्वत:शी ओळख करुन घ्या आणि त्याप्रमाणे आपण वागा. स्वत:बद्दल विचार करण्यापेक्षा दुसऱ्यांबद्दल विचार करायला शिका. त्यातच तुमच्या बऱ्याचशा प्रश्नांची उत्तरे सामावलेली आहेत.

आजच्या आपल्या चर्चेतून आपण नक्कीच चांगले जीवन जगण्यासाठी भव्य स्वप्ने पहाल याची खात्री आहे. स्वप्ने पाहता पाहता मने आशावादी राहतात, खूप कष्ट केले, निरंतर काम केले तरच यश प्राप्त होते! नाती नाजूक असतात; ती जोपासावी लागतात. 'कृतज्ञता' हे पवित्र मूल्य आहे. इतरांनाही दर्जेदार माना, स्वत:चा दर्जा राखा, आपण नक्कीच कौटुंबिकस्तरावरही सुखी-समाधानी रहाल! आपणा सर्वांशी चर्चा करण्याची संधी आयोजकांनी दिली, त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.

धन्यवाद.